। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ४६ वा । शनिवार, दिनांक ०२ मे २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# बारावीचा निकाल लागला

## कोकण विभाग ९४.१४% सह अव्वल, लातूरची घसरगुंडी

पुणे/वृत्तसंस्था : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केला असून, यंदा राज्याचा एकूण निकाल ८९.७९ टक्के लागला आहे. विशेष म्हणजे, गेल्या पाच वर्षांतील हा निचांकी निकाल असून राज्याच्या निकालाचा टक्का पुन्हा एकदा घसरल्याचे पाहायला मिळत आहे. विभागात दरवर्षीप्रमाणे ९४.१४ टक्क्यांसह कोकण विभागाने आपले वर्चस्व कायम राखले आहे, तर कधीकाळी शैक्षणिक पॅटर्नसाठी ओळखल्या जाणाऱ्या लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के लागल्याने हा विभाग राज्यात सर्वात शेवटी ठरला आहे.



बारावीचा विभागनिहाय निकाल

१ कोकण ९४.१४ टक्के
२. पुणे ९१.२५ टक्के
३. अमरावती ९०.९२ टक्के
४ नाशिक ९०.७२ टक्के
५ मुंबई ९०.०८ टक्के
६ कोल्हापूर ८९.९७ टक्के
७ छत्रपती संभाजीनगर ८८.६८ टक्के
८ नागपूर ८८.६७ टक्के
९ लातूर ८४.१४ टक्के

**इयत्ता बारावी निकालाची ठळक वैशिष्ट्ये**

या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर क कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम व आय. टी. आय. या शाखांसाठी एकूण १४,४४,७१३ नियमित विद्याथ्र्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,३३,०५८ विदयार्थी प्रविष्ट झाले असून त्यापैकी १२,८६,८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व उत्तीर्णतची टक्केवारी ८९.७९ आहे.

खाजगी विदयार्थी म्हणून नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३७,५५९ एवढी असून त्यापैकी ३६,९४१ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून २९,६३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या उत्तीर्णतची टक्केवारी ८०.२१ आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ५०,८७६ पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५०,३४६ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १८,३४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ३६.४४ आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून एकूण ८,४४६ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८,३६७ दिव्यांग विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी ७,५७९ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९०.५८ आहे.

इ.१२ वी परीक्षेस नोंदणी केलेल्या पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रचलित पद्धतीने सवलतीचे गुण देण्याबाचत कार्यवाही करण्यात आलेली आहे.


सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (९४.१४ %) सर्वाधिक असून सर्वांत कमी निकाल लातूर विभागाचा (८४.१४%) आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.१५ असून मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८६.८०% आहे. म्हणजेच मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ६.३५% ने जास्त आहे.

एकूण १५३ विषयांपैकी २६ विषयांचा निकाल १००% आहे.

# देशभरात कोट्यवधी मोबाईलवर एकाच वेळी आला अलर्ट मेसेज

## सायरनचा आवाज ऐकू आला, आपत्कालीन विभागाने चाचणी केली

*नवी दिल्ली/वृत्तसंस्था : देशभरात शनिवारी सकाळी ११:४५ वाजता अनेक मोबाईल फोनवर एकाच वेळी सायरनचा आवाज ऐकू येऊ लागला. स्क्रीनवर हिंदी-इंग्रजीमध्ये एक संदेश होता. सायरन बंद झाल्यावर मोबाईलवर संदेश वाचूनही दाखवण्यात आला. यामुळे अनेक लोक अस्वस्थ झाले, तर अनेकजण गोंधळले. मात्र, सरकारने घाबरण्याची गरज नसल्याचे सांगितले.*




हा संदेश राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरण, म्हणजेच NDMA ने पाठवला होता, जो आपत्कालीन मोबाईल अलर्ट चाचणीचा भाग आहे. NDMA ने आपत्कालीन परिस्थितीत लोकांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी २ मे रोजी या सेल ब्रॉडकास्ट अलर्ट प्रणालीची चाचणी केली.

सेल ब्रॉडकास्ट तंत्रज्ञानामुळे आपत्कालीन परिस्थितीत रिअल-टाइम अलर्ट मिळेल

NDMA ने मोबाईल डचड ला सेल ब्रॉडकास्ट (CB) तंत्रज्ञानाशी जोडले आहे. यामुळे निवडलेल्या परिसरात सक्रिय असलेल्या सर्व मोबाईल फोनवर एकाच वेळी अलर्ट मिळेल. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रिअल टाइम माहिती पोहोचवता येईल.

**देशभरात आपत्कालीन संदेशाची एकाच वेळी चाचणी**

शनिवारी देशातील सर्व राज्यांच्या राजधान्यांमध्ये आणि दिल्ली-NCR मध्ये सर्व मोबाईल फोनवर एकाच वेळी चाचणी संदेश पाठवण्यात आला. हा संदेश हिंदी आणि इंग्रजीसोबत सर्व प्रादेशिक भाषांमध्येही पाठवण्यात आला. या संदेशात लोकांना सांगण्यात आले की ही केवळ चाचणी आहे आणि यावर कोणतीही कारवाई करण्याची गरज नाही.

**सरकारने आधीच सांगितले होते – संदेशामुळे घाबरू नका**

सरकारने दोन दिवसांपूर्वीच मेसेज पाठवून लोकांना आवाहन केले होते की, टेस्टिंगचा मेसेज मिळाल्यास घाबरू नका. शनिवारचा मेसेज केवळ आपत्कालीन परिस्थितीत इशारा देणाऱ्या प्रणालीची तपासणी करण्यासाठी पाठवण्यात आला होता.

**SACHET प्रणाली देशातच विकसित केली आहे**

आपत्कालीन परिस्थितीत लोकांना रिअल टाइम अलर्ट देण्यासाठी सरकारी संस्था सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ टेलीमॅटिक्स (C-DOT) ने 'SACHET' ही एकात्मिक अलर्ट प्रणाली विकसित केली आहे. सचेत नावाचे हे सिस्टम कॉमन अलर्टिंग प्रोटोकॉल (CAP) वर आधारित आहे. हे देशातील सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सक्रिय करण्यात आले आहे.

## प्रभात किरणे

बुद्धीवाण प्राणी न करी
बुद्धीचा वापर
कधी न बदले भविष्य,
म्हणे नशिबी नसे
अज्ञानातून अंधश्रद्धा,
करी पूजा नवस
कष्ट धन वाया,
न मिळे कांही,
होई हासे

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर. ९७६४७ ८८२८८

# ‘वासरू दाखवतो’ म्हणत गोठ्यात नेले; चिमुकलीवर अत्याचार करून मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवला

**नसरापूर/ पुणे-प्रतिनिधी** : भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षीय निष्पाप बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन छेडत पुणे-सातारा महामार्ग तब्बल दोन तास रोखून धरला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिमराव (वय ६ ०, रा. साळवडे, ता. भोर) या गुन्हेगारांने वासरू दाखवतो असे सांगून चिमुकलीला गुरांच्या गोठ्याकडे नेले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये बालिका निरागसपणे आरोपीसोबत जाताना दिसत आहे. त्यानंतर आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या केली आणि मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवला.

ही बालिका सुट्टीसाठी आजोळी आली होती. बराच वेळ ती दिसत नसल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. दरम्यान, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे ग्रामस्थांनी आरोपीचा माग काढत त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.




दरम्यान, पोलिसांनी पंचनामा आणि तपास प्रक्रिया सुरू असताना ग्रामस्थांना माहिती न दिल्याचा आरोप करत नागरिक संतप्त झाले. हजारो ग्रामस्थ घटनास्थळी जमले आणि आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी करत बाजारपेठ बंद ठेवली. त्यानंतर संतप्त नागरिकांनी पुणे-सातारा महामार्गावर उतरून रास्ता रोको आंदोलन केले. रात्री उशिरापर्यंत महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

तपासादरम्यान आरोपीविरोधात यापूर्वीही महिलांच्या लैंगिक छळाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. एका प्रकरणात त्याने शिक्षा देखील भोगली होती, अशी प्राथमिक माहिती पोलिसांकडून देण्यात आली. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी घटनास्थळी भेट देत नागरिकांशी संवाद साधला. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. १ ५ दिवसांत आरोपपत्र दाखल करून कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेत महामार्गावरील वाहतूक पूर्ववत केली.

या घटनेमुळे नसरापूरसह संपूर्ण पुणे जिल्हा हादरला असून आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ‘स्व-गणना’ सुविधेचा लाभ घेवून जनगणना प्रक्रियेत सहभाग नोंदवावा -पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर/प्रतिनिधी** : देशाच्या भविष्यातील विकासाचे अचूक नियोजन करण्यासाठी जनगणना प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे. ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने प्रथमच 'स्व-गणना' ही विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेचा लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेऊन या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले आहे. त्यांच्या उपस्थितीत स्व-गणना मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

१ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वतःच्या कुटुंबाची माहिती नोंदवता येणार आहे. यासाठी नागरिकांनी se.census.gov.in या अधिकृत पोर्टलवर जाऊन कुटुंब प्रमुखाच्या मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. एकदा माहिती यशस्वीरीत्या भरली की, नागरिकांना एक 'SE ID' प्राप्त होईल. १६ मे पासून जेव्हा शासकीय प्रगणक घरोघरी भेटी देतील, तेव्हा त्यांना केवळ हा 'आयडी' दाखवल्यास जनगणनेची प्रक्रिया तातडीने पूर्ण होईल. या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून माहितीमध्ये अचूकता राहण्यास मदत होणार आहे.




जनगणनेच्या या पहिल्या टप्प्यात मुख्यत्वे घरांची माहिती संकलित केली जाणार असून, दुसरा टप्पा २०२७ मध्ये पार पडेल. प्रशासनाकडून विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची नागरिकांनी अचूक उत्तरे द्यावीत आणि या राष्ट्रीय कार्यात प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे. आपली अचूक नोंदणी, हेच देशाच्या उज्ज्वल भविष्याचे नियोजन आहे, असे नमूद करत पालकमंत्र्यांनी स्व-गणना सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



व्यावसायिक गॅस सिलेंडर ९९३ रुपयांनी महागले

## चिमटा



दयाचा

पाणी टंचाई भासत आहे!
लातूर महानगरपालिकेला
नियोजनाची गरज
आहे !!
उन्हाळा कठिण
जाण्याची शक्यता
आहे!!!

# डिजिटल युगात ग्रंथालयाकडे वळा; चांगल्या करिअरसाठी वाचन आवश्यक


## वंदना काटकर यांचे प्रतिपादन; एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** डिजिटल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे युवक ग्रंथालयापासून दूर जात असून अभ्यासासाठीचा मौल्यवान वेळ मोठ्या प्रमाणात मोबाईलवर खर्च होत आहे. त्यामुळे जीवनात उत्तम करिअर घडवायचे असेल, तर ग्रंथ आणि ग्रंथालयाशी जवळीक निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा ग्रंथालयाच्या ग्रंथपाल श्रीमती वंदना काटकर यांनी केले.

येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ग्रंथालय समिती व आयपीआर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ‘जागतिक पुस्तक व कॉपीराईट दिना’निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड, ओरल पॅथॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. वर्षा सांगळे, ग्रंथालय चेअरमन डॉ. महेश दडपे, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सिंगारा वेलन, पिकेसीएन च्या प्राचार्य स्वाती एवंदगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सध्याच्या डिजिटल युगातील वास्तव अधोरेखित करत पुढे बोलताना वंदना काटकर म्हणाल्या की, आज मोबाईल, सोशल मीडिया आणि विविध डिजिटल माध्यमांमुळे युवकांची माहिती मिळवण्याची पद्धत बदलली आहे. माहिती सहज उपलब्ध होत असली तरी त्याचा सखोल अभ्यास, चिंतन आणि विश्लेषण करण्याची सवय मात्र कमी होत चालली आहे. मोबाईलवर मिळणारी माहिती बहुधा क्षणिक आणि अपूर्ण असते, तर ग्रंथ वाचनातून ज्ञान अधिक व्यापक, सखोल आणि दीर्घकाळ टिकणारे मिळते.

चांगले करिअर घडवण्यासाठी केवळ परीक्षा पास होणे पुरेसे नसून व्यक्तिमत्त्व विकास, विचारांची परिपक्वता आणि निर्णयक्षमता विकसित होणे आवश्यक आहे. हे सर्व गुण नियमित वाचनातूनच विकसित होतात. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे संकलन नसून ते ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचे केंद्र आहे. येथे




मिळणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी एकाग्रता आणि सकारात्मक ऊर्जा प्रदान करते.

डिजिटल साधने ही काळाची गरज असली तरी त्यांचा योग्य वापर करणे तितकेच महत्त्वाचे आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा वापर मर्यादित ठेवून दररोज ठराविक वेळ वाचनासाठी द्यावा, असे आवाहन केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय हे सर्वोत्तम साधन असून तेथे उपलब्ध संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे आणि मासिके यांचा नियमित अभ्यास केल्यास यश निश्चित मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, विद्यार्थ्यांनी केवळ वाचनावर मर्यादित न राहता लेखनाचीही सवय लावावी. स्वतःचे विचार मांडण्याची क्षमता विकसित करण्यासाठी लेख, कविता, संशोधनात्मक लेखन यांचा सराव आवश्यक आहे. आजचा वाचक उद्याचा लेखक होऊ शकतो आणि याच प्रक्रियेतून समाजाला दिशा देणारे विचारवंत तयार होतात, असे त्या म्हणाल्या.

यावेळी बोलताना डॉ. वर्षा सांगळे यांनी कॉपीराईट विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कॉपीराईट म्हणजे काय, त्याचे महत्त्व काय तसेच नोंदणी प्रक्रिया कशी करावी, याबाबत त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. स्वतःचे लिखाण सुरक्षित ठेवण्यासाठी कॉपीराईटचे महत्त्व त्यांनी प्रभावीपणे पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. तेजस कराड यांनी ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, ग्रंथालय हे वाचक आणि पुस्तक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. विद्यार्थ्यांनी लेखन करून त्याचे कॉपीराईट घेण्याचे आवाहन त्यांनी केले. संत ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा संदर्भ देत त्यांनी ‘ज्ञानेश्वरी’सारख्या अमूल्य ग्रंथनिर्मितीचा उल्लेख केला आणि विद्यार्थ्यांनीही चिरंतन कार्य करण्याचा प्रयत्न करावा, असे आवर्जून सांगितले.

यावेळी उत्कृष्ट ग्रंथालय उपयोगिता पारितोषिक शिक्षक वर्गातून डॉ. स्फूर्ती जोशी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांमधून डॉ. अंजली वशिष्ठ आणि पदवीपूर्व विद्यार्थ्यांमधून आकांक्षा गिरी यांना प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात निबंध व कविता लेखन स्पर्धा, तर पीकेसीएन महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच ‘ग्रंथालय स्टार’ हा वार्षिक पुरस्कार बीएससी नर्सिंग व जीएनएम वर्गातील विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन आझमी पेशीमाम यांनी केले, तर शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय व पीकेसीएन महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## चार तारखेकडे देशाचे लक्ष

देशात नुकत्याच मतदान झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल चार मे रोजी जाहीर होणार आहेत. एनडीएच्या घोडदौडीचा कल कायम आहे का याचे पाच राज्यांच्या निवडणुकांचे निकाल हे दिशादर्शक व राष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे ठरणार आहेत. हे कळणार आहे. पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात एनडीएचे सत्तेत पुनरागमन होते किंवा नाही हे पाहणे औत्सुक्याचे असले तरी ते निकाल राष्ट्रीय स्तरावर फारसा प्रभाव टाकणारे नव्हेत. मात्र पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ व आसाम या राज्यांचे निकाल मात्र सर्वच राजकीय पक्षांची कसोटी पाहणारे आहेत. त्यातही सर्वाधिक लक्षवेधी निवडणूक पश्चिम बंगालची आहे. तेथे भाजपची थेट लढत तृणमूल काँग्रेस या प्रादेशिक पक्षाशी आहे. अन्य राज्यांपेक्षा ही अगदी निराळी स्थिती आहे. त्या राज्यात केंद्रीय निवडणूक आयोगाने राबवलेली सखोल मतदारयाद्या फेरतपासणी (एसआयआर) मोहीम वादाच्या भोवऱ्यात सापडली. ती मोहीम आसाम वगळता अन्यही राज्यांत राबविण्यात आली आणि लाखो नावे मतदारयाद्यांतून वगळण्यात आली. ते प्रकरण न्यायालयापर्यंत पोचले. न्यायालयाने नावे वगळण्यात आलेल्या मतदारांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न केला तरी त्याने परिस्थिती फारशी बदलली नाही. एकट्या पश्चिम बंगालमध्ये मतदारयाद्यांतून वगळण्यात आलेल्या मतदारांचे प्रमाण सुमारे १२ टक्के होते; तेच केरळममध्ये ३ टक्के; तर पुद्दुचेरीत ७ टक्के. तामिळनाडूत ५७ लाख नावे वगळण्यात आली. आसाममध्ये मात्र ही मोहीम इतक्या तीव्रतेने राबविण्यात आली नाही. त्यामुळे तेथे हेच प्रमाण अवघा १ टक्का होते. एकीकडे मतदार वगळले गेले; तर दुसरीकडे पाचही राज्यांत मतदान मात्र विक्रमी झाले. पश्चिम बंगालमध्ये ९३ टक्के; आसाममध्ये ८६ टक्के; तामिळनाडूत ८५ टक्के व केरळममध्ये ७८ टक्के. साहजिकच या वाढीव मतदानाचा फायदा कोणाला होणार याचे तर्कवितर्क लढविले जाऊ लागले आहेत. जोवर निकाल जाहीर होत नाहीत तोवर या वाढलेल्या मतदानाचा फायदा आपल्यालाच होणार असा दावा करण्याची मोकळीक सर्वच पक्षांना आहे. तथापि या वाढीव मतदानाच्या अन्वयार्थाचे इतके सुलभीकरण करणे उचित नाही. याचे कारण हे वाढीव मतदान का झाले याचा शोध घेणे गरजेचे. 'एसआयर' मोहिमेत त्याचे बीज दडलेले आहे. ज्यांची नावे मतदारयाद्यांत होती त्यांनी आपण मतदान केले नाही तर आगामी काळात आपलेही नाव वगळले जाऊ शकते याची धास्ती घेतली होती. साहजिकच केवळ कामगार-मजूर वर्गांतील नव्हे तर पांढरपेशी स्थलांतरित देखील यंदा मोठ्या प्रमाणावर मतदानासाठी आपापल्या गृहराज्यात आले होते. त्याचे प्रतिबिंब वाढलेल्या मतदानात पडले. मतदानाचा टक्का वाढणे म्हणजे विद्यमान सरकारबद्दलचा कौल किंवा नाराजी असे समीकरण मांडणे घाईचे ठरेल. राजकीय अभ्यासक मिलन वैष्णव आणि जोनाथन गाय यांनी भारतात १९८० ते २०१२ दरम्यान झालेल्या १८ राज्यांच्या १२३ विधानसभा निवडणुकांच्या निकालांचा सांख्यिकी आढावा घेणारा शोधनिबंध प्रसिद्ध केला होता. त्या संशोधनानुसार, भारतात मतदानाचे प्रमाण आणि प्रस्थापितविरोधी लाट यांचा थेट संबंध आढळलेला नाही. २०१० मध्ये बिहारमधील वाढीव मतदानाचा फायदा सत्ताधाऱ्यांना झाला; तर २०११ मध्ये तामिळनाडूत वाढीव मतदान होऊनही सत्ताधाऱ्यांना पराभव स्वीकारावा लागला ही याची काही मासलेवाईक उदाहरणे. तेव्हा वाढीव मतदान हे चुरशीच्या लढतीचे लक्षण असू शकते; पण तो कोणत्याही एका पक्षाच्या विजयाचा स्पष्ट संकेत नाही. त्यामुळे निकाल लागण्यापूर्वी राजकीय पक्षांनी व समर्थकांनी हुरळून जाण्याचे कारण नाही. तथापि जे राजकीय व जमिनीवरील संकेत आहेत त्यावरून अंदाज मात्र अवश्य व्यक्त करता येतील. आसाममध्ये गेल्या निवडणुकीत भाजप आघाडी व काँग्रेसप्रणित आघाडी यांच्यातील संख्याबळातील अंतर २५ जागांचे होते. यावेळी काँग्रेसने आपली सारी ताकद तेथे ओतली आहेच; शिवाय मित्रपक्षांना बरोबर घेत आघाडी केली आहे. तेथे प्रचार हा अतिशय वैयक्तिक हल्ल्यांच्या स्तरावर उतरला होता; त्याला धार्मिक ध्रुवीकरांचे वळण मिळाले होते आणि धोरणात्मक मुद्द्यांपेक्षा भडक मुद्द्यांना प्राधान्य मिळाले होते. भाजपला सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळाली मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांचा दबदबा केवळ आसाम व ईशान्य भारतातच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणातही वाढेल यात शंका नाही. प ण भाजपचा पराभव झाल्यास तो मोठा राजकीय धक्का मानला जाईल. यामुळे 'एनआरसी' आणि 'सीएए'सारख्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी कायद्यांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण होईलच; शिवाय मणिपूरसारखे संवेदनशील प्रश्न अधिकच ऐरणीवर येतील. तामिळनाडूत द्रमुक आघाडीची बाजू वरचढ आहे असा अंदाज व्यक्त होत आहे. याचे मुख्य कारण अण्णा द्रमुकचे असणारे कमकुवत आव्हान. ओ पनीरसेल्व्हम यांनी अण्णा द्रमुकमधून द्रमुकमध्ये केलेला प्रवेश; त्यांच्या जातीसमुदायामध्ये अण्णा द्रमुकबद्दल पसरलेली नाराजी, शशिकला यांनी स्थापन केलेला नवीन पक्ष; परिणामतः द्रमुकविरोधी मतांमध्ये होणारी संभाव्य विभागणी; पीएमके पक्षातील फुटीमुळे त्या पक्षाचीच नव्हे तर अण्णा द्रमुक आघाडीची घटलेली ताकद; अन्नामलाई यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटविल्याने विशेषतः तरुणांमध्ये भाजपबद्दल असणारा रोष आणि गेल्या विधानसभा निवडणुकांनंतर झालेल्या पोटनिवडणुका; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका इत्यादी अकरा निवडणुकांत ई पलानीस्वामी यांच्या नेतृत्वात अण्णा द्रमुकच्या वाट्याला आलेले अपयश यांमुळे त्या आघाडीला चमकदार कामगिरी करता येईल याची शक्यता कमीच. द्रमुकच्या पुनरागमनात अडचण आहे ती केवळ विजय यांच्या टीव्हीके पक्षाची. त्या पक्षाकडे लोकप्रिय नेतृत्व आहे हे खरे; पण अन्य पक्षांतून आयात केलेले उमेदवार; पक्ष संघटनेची वानवा; राजकीय अनुभवाचा अभाव यांमुळे त्या पक्षाला स्वबळावर सत्तेपर्यंत झेप घेता येणे कठीण दिसते. केरळममध्ये यंदा सत्तांतर होण्याची शक्यता दाट असून काँग्रेसप्रणित यूडीएफला सत्ता मिळेल असे चित्र आहे.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग 'मिसिंग लिंक' विकासाला वेग देणारा आधुनिक महामार्ग

### वेग, सुरक्षितता आणि आधुनिक अभियांत्रिकीचा संगम





**मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा कणा मानला जातो. राज्यातील औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींना गती देणारा हा मार्ग आता 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहे. केवळ वाहतूक सुलभ करण्यापुरता मर्यादित न राहता, हा प्रकल्प राज्याच्या व्यापक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा हा महामार्ग दररोज हजारो वाहनांची वाहतूक सांभाळतो. मात्र, बोरघाट परिसरातील तीव्र वळणे, चढ-उतार, पावसाळ्यातील दरडी कोसळण्याचे प्रकार आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही वर्षानुवर्षे मोठी समस्या राहिली. या अडचणींवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेला शासनाची मंजुरी मिळाली. सुमारे ६६९५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला आहे.**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा कणा मानला जातो. राज्यातील औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींना गती देणारा हा मार्ग आता 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहे. केवळ वाहतूक सुलभ करण्यापुरता मर्यादित न राहता, हा प्रकल्प राज्याच्या व्यापक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा हा महामार्ग दररोज हजारो वाहनांची वाहतूक सांभाळतो. मात्र, बोरघाट परिसरातील तीव्र वळणे, चढ-उतार, पावसाळ्यातील दरडी कोसळण्याचे प्रकार आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही वर्षानुवर्षे मोठी समस्या राहिली. या अडचणींवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेला शासनाची मंजुरी मिळाली. सुमारे ६६९५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला आहे.

**पार्श्वभूमी : समस्येतून उपायाकडे**

अडोशी बोगदा ते खंडाळा एक्झिट हा मार्ग सध्या सहा पदरी असला तरी येथे दहा पदरी वाहतूक एकत्र येते. घाटातील अवघड भौगोलिक परिस्थितीमुळे अनेकदा वाहतुकीचा वेग मंदावतो. विशेषतः पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढतो आणि काही लेन बंद कराव्या लागतात. यामुळे वेळेचा अपव्यय, अपघातांची शक्यता आणि आर्थिक नुकसान वाढते. या पार्श्वभूमीवर 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा एक पर्यायी, अधिक सुरक्षित आणि सरळ मार्ग म्हणून उभारण्यात आला आहे.

**प्रकल्पाचे स्वरूप : अंतर कमी, वेळ वाचणार**

या प्रकल्पाअंतर्गत खोपोली ते कुसगाव दरम्यान नवीन सरळ मार्ग तयार करण्यात आला आहे. एकूण १९.८४ कि.मी. लांबीच्या या मार्गात ५.८६ कि.मी. अंतरावर जुन्या रस्त्याचे सहा पदरीवरून आठ पदरीकरण करण्यात आले आहे, तर उर्वरित १३.३ कि.मी. पूर्णपणे नवीन मार्ग आहे. या नव्या मार्गामुळे प्रवासाचे अंतर सुमारे ६ किमीने कमी होणार असून, २० ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

**अभियांत्रिकीचा अद्भुत नमुना**

गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद

मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित होत आहे. मिसिंग लिंकसह वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५ मीटर) असून लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी ६५० मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच सत्यावरील पूल पायलॉन उंची (१८२मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद झालेली आहे.

हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या घटवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठी सुधारणा होणार आहे.

मिसिंग लिंक' प्रकल्प हा आधुनिक अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. या प्रकल्पात दोन समांतर बोगदे (१.६४ कि.मी. आणि ८.९२ कि.मी.), भव्य व्हायाडक्ट, यांचा समावेश असून, वाहनांचा वेग १२० कि.मी. / तास ठेवण्याची सुविधा या मार्गावर उपलब्ध आहे.सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान

या प्रकल्पात प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. बोगद्यांमध्ये वॉटर मिस्ट अग्निशमन प्रणाली, स्कॅडा आधारित नियंत्रण, एएनपीआर कॅमेरे, व्हाइस इव्हॅक्यूएशन सिस्टिम, आधुनिक वायुवीजन व्यवस्था आणि एसओएस सुविधा बसवण्यात आल्या आहेत. या सर्व प्रणालींमुळे अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देणे शक्य होणार आहे.

**मिसिंग लिंकची व्यापक उपयुक्तता**

'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे अनेक महत्त्वपूर्ण लाभ अपेक्षित आहेत. प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार असून, घाटातील धोकादायक वळणे टाळल्याने अपघातांचे प्रमाण घटेल. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक सुरळीत होईल. इंधनाच्या वापरात घट होऊन दररोज सुमारे १ कोटी रुपयांची बचत होईल, अशी अपेक्षा आहे. एकूणच, हा प्रकल्प प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर बनवणार आहे.

**कठीण परिस्थितीतही यश**

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक आणि नैसर्गिक आव्हानांचा सामना करावा लागला. डोंगराळ भागात बोगदे खोदणे, घनदाट वनक्षेत्रात काम करणे, मुसळधार पावसामुळे होणारे अडथळे, तसेच बोगद्यांमध्ये ऑक्सिजन पुरवठा आणि सुरक्षा व्यवस्थापन ही मोठी आव्हाने होती. याशिवाय कोविड-१९ महामारीमुळे आणि काही तांत्रिक चाचण्यांसाठी परदेशी संस्थांवर अवलंबून राहावे लागले मात्र या सर्व अडचणींवर मात करत प्रकल्प यशयशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला.

**विकासाच्या दिशेने मोठे पाऊल**

मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ एक रस्ता नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि दृष्टीकोन यांचा संगम आहे. या प्रकल्पामुळे केवळ प्रवास सुलभ होणार नाही, तर राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. भविष्यात हा प्रकल्प महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. महामार्ग हे कोणत्याही राज्याच्या अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे असतात. मुंबई आणि पुणे ही दोन प्रमुख आर्थिक केंद्रे जोडणारा हा मार्ग उद्योग, आयटी, उत्पादन क्षेत्र आणि सेवा क्षेत्रासाठी जीवनदायिनी भूमिका बजावतो. 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे या दोन शहरांमधील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम होणार असल्याने व्यापार आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळणार आहे.

**दळणवळण सुविधांचा विस्तार**

या प्रकल्पामुळे केवळ दोन शहरांमधील अंतर कमी होत नाही, तर संपूर्ण प्रदेशातील दळणवळण सुविधांचा दर्जा उंचावतो. खोपोली, लोणावळा, कुसगाव यांसारख्या परिसरांना अधिक चांगली जोडणी मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण आणि अर्धशहरी भागांपर्यंतही विकासाच्या संधी पोहोचतील. आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या सुविधा अधिक सहज उपलब्ध होतील.

**पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्था**

मुंबई-पुणे मार्ग हा पर्यटनासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. लोणावळा, खंडाळा यांसारख्या पर्यटनस्थळांना या मार्गामुळे अधिक वेगाने पोहोचता येईल. परिणामी पर्यटन वाढून स्थानिक व्यवसाय, हॉटेल उद्योग आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल. स्थानिक रोजगारनिर्मितीतही वाढ होईल.

**शाश्वत आणि संतुलित विकास**

वाहतुकीचा प्रवाह सुरळीत झाल्यामुळे वाहनांची गर्दी कमी होईल आणि इंधनाचा वापरही घटेल. यामुळे पर्यावरणावर होणारा ताण कमी होण्यास मदत होईल. नियोजनबद्ध पायाभूत सुविधा विकासामुळे हा प्रकल्प शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरतो. मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ प्रवास सुलभ करणारा रस्ता नसून, राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा महामार्ग आहे. आर्थिक वाढ, दळणवळण सुधारणा, सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन या सर्व बाबींचा समतोल साधत हा प्रकल्प महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहिणार आहे.

**– वंदना रघुनाथराव थोरात,**
**वरिष्ठ सहायक संचालक,**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय,मंत्रालय.**

## वजन कमी करणाऱ्या औषधांमुळे वेडिंग इंडस्ट्री अडचणीत: फिटिंग एक आव्हान बनले

प्रोडक्ट डिझायनर निकोल हॅमिल्टनला तिचा लग्नाचा ड्रेस मिळाला. सुंदर ए-लाइन गाऊन, हाताने बनवलेले मणी, प्रत्येक शिलाई परिपूर्ण. पण जेव्हा तिने तो ड्रेस विकत घेतला, तेव्हा तिला एका ठिकाणी सही करावी लागली. तो सामान्य कागद नव्हता, तर एक कायदेशीर दस्तऐवज होता. त्यात लिहिले होते की हा ड्रेस सध्या तिच्या शरीरावर फिट बसत नाहीये. कारण... निकोलने गेल्या काही वर्षांत वजन कमी करण्याच्या औषधांच्या (जीएलपी-१) मदतीने ५० पाउंड म्हणजेच सुमारे २३ किलो वजन कमी केले आहे. एंगेजमेंटनंतरही तिने अतिरिक्त ७ किलो वजन कमी केले आहे. ती इथेच थांबणार नाहीये.

निकोलसारख्या कथा आता अमेरिकेच्या वेडिंग इंडस्ट्रीला हादरवून सोडत आहेत. ओझेम्पिक आणि वेगोवी सारखी जीएलपी-१ औषधे इतक्या वेगाने परिणाम करतात की काही महिलांना दर दोन ते तीन आठवड्यांनी कपडे सैल होऊ लागतात. आधी ब्रायडल स्टोअर्समध्ये अशी परंपरा होती की वधू लग्नाच्या पाच-सहा महिने आधी ड्रेस निवडायची, फिटिंग व्हायची आणि सर्व काही आरामात व्हायचे. आता तो सगळा हिशोब बिघडला आहे.

अमेरिकेतील सर्वात मोठ्या ब्रायडल रिटेलर डेव्हिड्स ब्रायडलच्या सीईओ केली कुक यांच्या मते, आता अनेक वधू लग्नाच्या अवघ्या ४५ दिवसांपूर्वी ड्रेस खरेदी करायला येतात. गेल्या दोन वर्षांत 'रश ऑर्डर' म्हणजे चार आठवड्यांपेक्षा कमी वेळेत तयार होणाऱ्या ड्रेसची मागणी ५०% वाढली आहे. यासाठी कंपनीला ३,००० हून अधिक टेलरिंग तज्ञांकडून ओव्हरटाइम करून घ्यावा लागत आहे.

**प्रत्येक १० पैकी १ वधू-वर जीएलपी-१ घेत आहेत, तेवढेच घेण्याचा विचार करत आहेत**

वेडिंग प्लॅनिंग प्लॅटफॉर्म झोलाच्या एका सर्वेक्षणात ११,५०० हून अधिक जोडप्यांना विचारण्यात आले की ते वजन कमी करणारी औषधे घेतात का? निकाल धक्कादायक होते - या वर्षी लग्न करणाऱ्या प्रत्येक १० पैकी १ जोडप्यात कोणीतरी जीएलपी-१ औषध घेत आहे. तेवढेच लोक ते घेण्याचा विचारही करत आहेत. सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे जे लोक हे औषध घेत आहेत, त्यापैकी निम्म्याहून अधिक लोकांनी लग्नामुळेच ते घेणे सुरू केले होते.

**एंगेजमेंटपासून लग्नापर्यंत वजन कमी होण्याचा अंदाज लावणे कठीण**

ह्यूस्टनच्या ब्रायडल स्टुडिओच्या मालकीण नताली हॅरिस २० वर्षांपासून हे काम करत आहेत. त्या म्हणतात, 'आधी अंदाज लावणं सोपं होतं - जर वधूने ५-१० पाउंड वजन कमी केलं, तर ड्रेसमध्ये इतका बदल होईल. आता हा अंदाज लावणं अशक्य झालं आहे.' त्यांनी सांगितलं, 'काही वधू आधी सफरचंदाच्या आकाराच्या (एपल शेप) होत्या आणि आता त्यांची कंबर नाट्यमयरित्या लहान झाली आहे.' हॅरिस जीएलपी-१ औषधे घेणाऱ्या वधूंना असे ड्रेस सुचवतात, ज्यात झिपऐवजी लेस-अप बॅक असेल, म्हणजे ज्याला घट्ट किंवा सैल करता येईल. त्यांना असे कट आवडतात जे कमरेवर फ्लेअर असलेले असतील, जेणेकरून बदललेला आकार लपवता येईल.

**उद्योग क्षेत्रासाठी ही इतकी मोठी समस्या का आहे?**

अमेरिकेत लग्नाच्या ड्रेसची सरासरी किंमत २,२५० डॉलर (सुमारे २ लाख रुपये) आहे. डिझायनर गाऊनमध्ये ही १०,००० डॉलर (९.५ लाख रुपये) पर्यंत जाते. इतका खर्च करणाऱ्या वधू प्रत्येक शिलाईमध्ये परफेक्शन अपेक्षित करतात. हेच ब्रायडल मार्केटसाठी सर्वात मोठे आव्हान आहे. वर देखील बारीक होत आहेत. पेनसिल्व्हेनियाच्या वेंडी इयानीरी-सॅलेर्नो म्हणतात की, फक्त वधूच नाही, तर होणारे वर देखील वजन कमी करत आहेत. फरक हा आहे की पुरुषांचे सूट ॲडजस्ट करणे सोपे आहे. भाड्याने नवीन साईज मिळतो, पण ब्रायडल गाऊनची गोष्ट वेगळी आहे- तिथे प्रत्येक इंचासाठी संघर्ष असतो.

oooooooooooooooooooooo

## चालणे-व्यायामाप्रमाणेच फायदेशीर आहे हसणे: संशोधन सांगते की, १५ मिनिटे खळखळून हसणे एक हजार पावले चालण्यासारखे आहे

हार्वर्ड मेडिकल स्कूलचे संशोधन सांगते की तुमचे हसणे औषधांसारखे काम करते. जेव्हा वृद्ध व्यक्ती १० ते १५ मिनिटे मनमोकळेपणाने हसतात, तेव्हा त्यांच्या शरीरात तशाच प्रतिक्रिया होतात, ज्या जलद चालण्याने आणि हलक्या व्यायामाने होतात.

**मानसिक आरोग्य चांगले राहते – वाढत्या वयात मनमोकळेपणाने हसल्याने होणारे ३ मोठे बदल**

संशोधनानुसार, मनमोकळेपणाने हसताना वृद्धांच्या शरीरात तीन मोठे बदल होतात, जे वाढत्या वयात मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

कॉर्टिसोलमध्ये घट - हसणे तणाव वाढवणारे हार्मोन 'कॉर्टिसोल'ची पातळी कमी करते. कॅलिफोर्नियातील लोमा लिंडा युनिव्हर्सिटीच्या संशोधनानुसार, हसणे वृद्धांची स्मरणशक्ती ४०% पर्यंत सुधारू शकते, कारण ते तणाव कमी करते.

एंडोर्फिनचा स्राव - याला शरीराचे 'नैसर्गिक वेदनाशामक' म्हटले जाते. सांधेदुखी किंवा जुनाट वेदनांनी त्रस्त असलेल्या वृद्धांसाठी हसणे एक नैसर्गिक मलम आहे.

रोगप्रतिकारशक्ती वर्धक - हसण्यामुळे शरीरातील 'टी-सेल्स' आणि अँटीबॉडीजची संख्या वाढते, ज्यामुळे कोणत्याही संसर्गाशी लढण्याची क्षमता वाढते.

**हे २ उपाय मदत करतील**

**१. बनावटी हसू-** संशोधनानुसार, मेंदू खरे आणि बनावटी हसू यात फरक करू शकत नाही. जर तुम्ही एकटे असाल आणि विनाकारण हसण्याचे नाटक केले तरी, तरीही शरीरात खरे 'हॅपी हार्मोन्स'च बाहेर पडतात.

**२. सामाजिक हसू –** गटात हसणे ३० पट अधिक प्रभावी असते. बगीचा किंवा अशा कोणत्याही ठिकाणी लाफ्टर क्लबमध्ये सामील होणे हे वृद्धांचे एकटेपण दूर करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

**रक्ताभिसरण सुधारते – तरुण दिसण्यापासून कॅलरीज बर्न होण्यासारखे ५ मोठे फायदे**

**फुफ्फुसांचा व्यायाम:** खोलवर हसल्याने फुफ्फुसांमधील जुनी आणि दूषित हवा बाहेर पडते आणि ताजी ऑक्सिजनची पातळी वाढते. हे दमा किंवा श्वासोच्छवासाच्या समस्या असलेल्या वृद्धांसाठी उपयुक्त आहे.

**हृदयाचा व्यायाम –** हृदयरोगतज्ञांनुसार, हसताना रक्तवाहिन्या प्रसरण पावतात. रक्ताभिसरण सुधारते आणि रक्तदाब नियंत्रित राहतो.

**कॅलरीज बर्न –** १० ते १५ मिनिटे हसल्याने सुमारे ४० कॅलरीज बर्न होतात, जे एका लहान वॉकच्या बरोबरीचे आहे.

**झोपेत सुधारणा –** संध्याकाळी मनमोकळेपणाने हसल्याने शरीर 'मेलाटोनिन' हार्मोन अधिक चांगल्या प्रकारे तयार करते, ज्यामुळे झोप गाढ आणि चांगली येते.

**वृद्धत्वविरोधी –** हसल्याने चेहऱ्यावरील स्नायू सक्रिय होतात, ज्यामुळे चेहऱ्यावर चमक आणि घट्टपणा येतो.

# मुलांचे केस पांढरे का होतात? पांढऱ्या केसांची समस्या होण्याची कारणे

वाढत्या वयानुसार केस पांढरे होणे ही एक सामान्य गोष्ट आहे. जेव्हा केस वेळेपूर्वीच पांढरे होऊ लागतात, तेव्हा ती चिंतेची बाब बनते. विशेषतः जेव्हा मुलांचे केस पांढरे होऊ लागतात, तेव्हा पालकांची चिंता वाढणे स्वाभाविक आहे. जर तुमच्या मुलाचे केस पांढरे होऊ लागले असतील, तर या कडे लक्ष देणं गरजेचं आहे.

मुलांचे केस पांढरे होण्याची कारणे

शरीरात पोषक तत्वांची कमतरता

मुलांमध्ये केस पांढरे होण्याचे मुख्य कारण पोषक तत्वांची कमतरता असल्याचे म्हटले जाते . डॉक्टरांच्या मते, जर मुलाच्या शरीरात आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता असेल, तर त्याचे परिणाम सर्वप्रथम केस आणि त्वचेवर दिसतात. व्हिटॅमिन बी१२, लोह, तांबे, जस्त आणि प्रथिने यांची कमतरता हे केस पांढरे होण्यामागील विशेषतः महत्त्वाचे घटक आहेत.

तणाव आणि झोपेचा अभाव

तज्ज्ञांच्या मते, सध्या लहान मुलांनाही शैक्षणिक दबाव, स्क्रीनसमोर अतिरिक्त वेळ घालवणे आणि कामगिरीचा दबाव यांचा सामना करावा लागत आहे. या घटकांमुळे तणाव वाढतो आणि झोप अपुरी होते, ज्यामुळे केस पांढरे होऊ शकतात.

आनुवंशिक कारणे

मुलांमध्ये अकाली केस पांढरे होण्याची अनेक कारणे असू शकतात. अनुवांशिकता किंवा कौटुंबिक इतिहास ही सर्वात सामान्य कारणे आहेत. जर पालकांना किंवा कुटुंबातील इतर सदस्यांना अकाली केस पांढरे होण्याची समस्या असेल, तर मुलालाही ही समस्या जाणवू शकते.

रासायनिक शाम्पूचा वापर-याव्यतिरिक्त, बालरोगतज्ज्ञांच्या मते पालक अनेकदा आपल्या मुलांच्या केसांसाठी रसायनयुक्त शाम्पू वापरतात. यामुळे केसांचा नैसर्गिक रंगही लवकर खराब होऊ शकतो.



हार्मोनल असंतुलन

थायरॉईडच्या समस्या आणि हार्मोनल असंतुलनामुळे देखील केस अकाली पांढरे होऊ शकतात. थायरॉईडच्या समस्यांमुळे चयापचय क्रिया मंदावते आणि केसांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

केस पांढरे होण्यापासून रोखण्यासाठी, आपल्या मुलाच्या आहाराकडे आणि दैनंदिन दिनचर्येकडे विशेष लक्ष देणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या शरीराला सर्व आवश्यक पोषक तत्वे मिळतील याची खात्री करण्यासाठी, त्यांच्या आहारात हिरव्या भाज्या, फळे, दूध, कडधान्ये आणि प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश करा. मुलांना पुरेशी झोप मिळेल याची खात्री करा आणि त्यांना तणावापासून दूर ठेवा. याव्यतिरिक्त, रासायनिक उत्पादने टाळा आणि केसांची चांगली स्वच्छता राखा. कोणतीही कमतरता किंवा समस्या लवकर ओळखण्यासाठी डॉक्टरांकडून नियमित तपासणी करणे देखील फायदेशीर ठरू शकते.

अस्वीकरण या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# शिक्षण केवळ साक्षरतेचा विचार नव्हे

शिक्षणबोध , संदीप वाकचौरे

शिक्षणाचा विचार करताना सातत्याने माणूस घडवणे अपेक्षित आहे. माणूस घडवणे म्हणजे नेमके काय? याचा विचार करताना मानवाचे माणसात रूपांतर करणे अपेक्षित आहे. मानवाचे रूपांतर माणसांत करायचे म्हणजे विवेक आणि शहाणपणाची वाट दर्शित करायची आहे. माणूस हा समाजशील प्राणी आहे असे अरिस्टॉटल यांनी म्हटले होते. समाजशील असण्याची प्रक्रिया ही शिक्षणातून दिल्या जाणार्या अनुभवाने विकसित करणे अपेक्षित आहे. त्याचवेळी शिक्षणातून जबाबदार नागरिक देखील घडवायचा आहे. आज समाजाला विवेकवादी चळवळीची गरज आहे. शिक्षणातून अनेक गोष्टी अपेक्षित केल्या आहेत; मात्र अपेक्षित केल्याप्रमाणे खरेच काही घडते का? शिक्षणाचा मार्ग हा विवेकवादी असावा असे म्हटले जात असताना तसे काही घडताना दिसत नाही. याचे कारण समाजात ज्या अनेक गोष्टी घडत आहेत आणि ज्या विविध प्रकारच्या घटना वर्तमानात समोर येत आहेत त्याचा विचार केला, तर शिक्षणातून यापैकी काहीच घडताना दिसत नाही. मग जे काही घडते आहे, ते नेमके काय आहे? आपल्याकडे शिक्षणाच्या नावाखाली फक्त साक्षरतेचा टप्पा पार केला जात आहे. विचार करायला शिकवणे घडत नाही. चांगले काय वाईट काय याचाही विचार करण्याची वृत्ती पुढे जाताना दिसत नाही. मग विवेकाची वाट तरी कशी सापडणार?

विवेकाची वाट म्हणजे प्रत्येक माणसाच्या आयुष्यात सुखाची वाट. समर्थ रामदास त्यांच्या साहित्यातून प्रत्येक नागरिकाला सुखाचा पत्ता सांगू पाहत आहेत. अर्थात ते जे काही सांगत आहेत, तो केवळ सुखाचा पत्ता नाही, तर ज्या झाडाला सुखाचे फळ लागते, त्या झाडाचे नावच वाचकांना सांगून सुखाचा प्रवास घडू पाहात आहेत. समर्थांप्रमाणे संतांच्या साहित्यात अनेक ठिकाणी त्या झाडाचा उल्लेख आलेला आहे; मात्र हे झाड ज्यांना ज्यांना हाती लागते, त्याच्या आयुष्यात दुःखाची वाट कधीच तुडवावी लागण्याची शक्यता नाही. संत इतक्या पद्धतीने सुखाचा पत्ता सांगत असताना आणि झाडाचे नाव देखील सांगत आहेत. तुमच्या आमच्या आयुष्यात दुःखच असणार असेल, तर ते झाड तुमच्या आमच्या हाती नाही, असेच म्हणावे लागेल. मुळात प्रत्येकाला त्या झाडाची वाट सापडावी आणि ती वाट शिक्षणातून मार्गक्रमण व्हावी अशी अपेक्षा आहे. ते झाड म्हणजे विवेक. या झाडाला सुखाचे फळ लागणार आहे. या झाडाची फळे नेहमीच गोड असतात. विवेकाची वाट चालणारी माणसे नेहमीच प्रगतीच्या उंचीवर पोहचली आहेत, असा आजवरचा इतिहास आहे.

**विवेकाची वाट**

विवेकाच्या वाटेने प्रवास घडावा म्हणून सातत्याने आवाहन केले जाते. शिक्षणाची उद्दिष्टे देखील त्याच दिशेने सूचित करत आहेत; मात्र तरी विवेकाची वाट चालणे घडत नाही; मात्र अविवेकाची वाट चालणे घडते. त्यामुळे अविवेकाच्या झाडालाही फळे लागतातच, त्यात शंका नाही; मात्र ती फळे दुःखाची असतात. मुळात सुखासाठीच सर्वजण धडपड करत असतात, त्यासाठी आपण अपरिमित कष्टसुद्धा घेत असतो; पण तरी सुखाची वाट काही सापडत नाही. त्यामुळे जीवनभर आपण धावाधाव करतो आणि तरीसुद्धा जीवनात निराशेची वाट चालावी लागते. याचे कारण योग्य वाटेचा प्रवास घडण्यासाठी विवेकाची वाट सापडलेली नाही. आपल्याला जर साखर हवी असेल, तर उत्तम दर्जाचा ऊस हवा; मात्र आपण उसाचा रस काढून फेकल्यांनतर जी चिपाडे उरतात त्यातून साखर काढण्याचा प्रयत्न केला, तर फार काही हाती लागणार नाही. ढेकणाने भरलेल्या बाजेवर शांत झोप येईल का? संत म्हणतात की, ढेकणाचिया बाजा सुखाची कल्पना ही कल्पना जशी मूर्खपणाची आहे. याचे कारण कोणी तसा विचार करणार असेल, तर तो अविवेकाचाच मार्ग आहे; मात्र त्यासाठी पूर्ण विवेकी विचार करण्याची गरज आहे.

विवेकाचे मोल जर इतके असेल आणि तुमच्या आमच्या जीवनात विवेकाशिवाय जर सुखच नसेल, तर विवेकी वाट जीवनात निर्माण व्हावी, म्हणून शिक्षणातून प्रयत्न करण्याची गरज आहे. मग विवेक म्हणजे तरी काय? विवेक हा संस्कृत शब्द आहे. त्याच्या निर्मितीचा विचार करताना तो 'विच' या धातूपासून तयार झाला आहे. विच म्हणजे भेद करणे. भेद करण्याचे सामर्थ्य असणे म्हणजे विवेक असे मानले जाते. विच म्हणजे अभ्यास. प्रज्ञा निवड करण्याची क्षमता. विवेक म्हणजे विचार करण्याची क्षमता. अगदी सहजतेने बोलायचे झाल्यास विवेक म्हणजे समंजस असे म्हणता येईल. बुद्धी या शब्दासाठी प्रज्ञा, विवेक आणि बुद्धिप्रामाण्यवाद असे पर्यायी शब्द वापरले जातात. विवेकाचा अर्थ आहे कोणत्याही गोष्टीचे, वस्तूंचे खरे स्वरूप ओळखण्यास शिकणे. या विवेकाच्या साधनाने जीवनातील निर्माण होणार्या समस्यातून योग्य मार्ग काढण्यास मदत होत असते. वस्तूचे खरे अंतरंग, मूल्य ओळखणे हे शब्द फार मोलाचे व महत्त्वाचे आहेत. हे शब्द आपण कधीही विसरता कामा नये. त्यामुळे मनुष्याजवळ सारासार विवेक सदविवेक असायला हवा.

**विवेकातून स्वविकास**

विवेकाचा अर्थ असतो कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विचार करणे व परिणाम समजून घेणे असते. इंद्रियांचा व मनाचा आवेग संयमित करणे. विवेक हा विचार करण्याची, योग्य व चुकीचे वेगळे करण्याची आणि परिस्थितीनुसार सुयोग्य निर्णय घेण्याची क्षमता मानली जाते. विवेक केवळ ज्ञानावर आधारित नसतो, तर अनुभव, नैतिक मूल्ये, सामाजिक परंपरा आणि अंतर्गत चेतनेवरही आधारित असतो. त्यामुळे या सर्व गोष्टी शिक्षणातून विकसित करण्याची गरज आहे. याचे कारण विवेकाची वाट चालण्यामुळे व्यक्तिगत जीवनावर देखील अत्यंत चांगला परिणाम झालेला आपणास अनुभवास येईल. विवेकामुळे निर्णय क्षमता वाढते: विवेकामुळे वेळी आणि योग्य पद्धतीने निर्णय घेण्यास मदत होते. ज्यामुळे अनावश्यक त्रास किंवा चुकीच्या मार्गावर जाण्यापासून टाळता येते. त्याचबरोबर स्व-विकास साधणे शक्य

# हात आणि पाय अचानक थंड पडणे हे एका गंभीर धोक्याचे लक्षण.....

लोक अनेकदा हात आणि पाय थंड पडण्याच्या समस्येकडे सामान्य समजून दुर्लक्ष करतात. पण तुम्हाला माहित आहे का की ही स्थिती तुमच्या शरीरात विकसित होत असलेल्या एखाद्या गंभीर आजाराचे प्रारंभिक चेतावणी चिन्ह असू शकते? मिळालेल्या माहितीनुसार, हात आणि पायांमध्ये सततचा गारवा किंवा बधिरता हे अंतर्गत अशक्तपणा आणि बिघडलेल्या रक्त परिसंचरणाचे थेट लक्षण आहे.

-ड्डज ठए-ऊ पाणी प्यायल्यानंतरही तुमचा घसा सतत कोरडा पडतो का? हे या गंभीर आजारांचे लक्षण असू शकते आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अनेक लोकांना उन्हाळ्याच्या कडक उन्हातही या समस्येचा अनुभव येतो. जेव्हा बाहेरचे तापमान ४० अंशांपेक्षा जास्त होते आणि तुमचे हात-पाय बर्फासारखे थंड लागतात, तेव्हा हे लक्षण आहे की तुमच्या शरीराचे तापमान नियंत्रक आणि रक्ताभिसरण प्रणाली योग्यरित्या काम करत नाहीत.

-ड्डज ठए-ऊ सायलेंट हार्ट अटॅक'ची ही लक्षणे दुर्लक्षित करू नका

हात आणि पाय थंड का होतात?

आपल्या शरीरातील रक्ताभिसरण केवळ ऑक्सिजनच पोहोचवत नाही, तर शरीराचे तापमानही राखते. जेव्हा हृदयाद्वारे बोटांपर्यंत आणि पायांच्या बोटांपर्यंत पुरेसे रक्त पोहोचत नाही, तेव्हा ते भाग थंड वाटू लागतात. याचे एक प्रमुख कारण म्हणजे अपचन. पचनक्रिया खराब असल्यास, शरीराला पुरेशी ऊर्जा मिळत नाही, ज्यामुळे चयापचय क्रिया मंदावते आणि अवयवांपर्यंत उष्णता पोहोचण्यास अडथळा येतो.




मानसिक ताण आणि शारीरिक अशक्तपणा रक्तवाहिन्यांच्या कार्यावर परिणाम करतात. या लक्षणाकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास रेनॉडचा आजार होऊ शकतो. या स्थितीत, रक्तवाहिन्या अतिशय अरुंद होतात, ज्यामुळे रक्तप्रवाह जवळजवळ थांबतो. यामुळे व्हॅरिकोज व्हेन्ससारख्या वेदनादायक समस्या देखील उद्भवू शकतात. तुम्ही चुकीच्या वेळी लस्सी पिता का? फायद्यांऐवजी नुकसान होऊ शकते

हात आणि पाय थंड पडण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे लोह आणि व्हिटॅमिन बी१२ ची तीव्र कमतरता असू शकते. लोहाच्या कमतरतेमुळे निमिया होतो, ज्यामुळे लाल रक्तपेशींचे उत्पादन कमी होते आणि अवयवांना होणारा ऑक्सिजनचा पुरवठा बाधित होतो.

काय करावे-रक्ताभिसरण सुधारण्यासाठी, दररोज किमान ३० मिनिटे चाला. यामुळे पायांच्या रक्तवाहिन्यांमधील रक्तप्रवाह वाढतो.जर तुमचे हात आणि पाय थंड वाटत असतील, तर त्यांना कोमट तेलाने मालिश करा. यामुळे नसा उत्तेजित होतात आणि उष्णता निर्माण होते.आपल्या आहारात लोह, मॅग्नेशियम आणि जीवनसत्त्वे भरपूर असलेल्या पदार्थांचा समावेश करा. यासाठी हिरव्या पालेभाज्या आणि सुकामेवा उत्तम आहेत. उन्हाळ्यात पुरेसे पाणी प्या, जेणेकरून रक्ताची घनता योग्य राहील आणि रक्ताभिसरणात अडथळा येणार नाही. हात आणि पाय थंड पडणे हे केवळ एक लक्षण नसून शरीराने दिलेला एक संकेत असू शकतो. ही समस्या कायम राहिल्यास, घरगुती उपायांसोबतच डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.अस्वीकरण (ऊळीलश्ररळाशी) : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




असं सांगितलं जातं, जेव्हा अफ्रोडाईट या प्रेमाच्या ग्रीक देवतेचा जन्म झाला, ती समुद्रातून वर आली होती. या देवतेच्या नावावरुनच ॲफ्रोडिजियाक हे नाव पडलं आहे. कामेच्छा जागृत करणाऱ्या अन्नाला अफ्रोडिजियाक म्हटलं जातं.कालवांना ॲफ्रोडिजियाक म्हटलं जातं. कालवांमध्ये मोठ्या प्रमाणात झिंक आढळतं. शरीरात टेस्टोस्टेरोनची निर्मिती करण्यासाठी झिंकचा उपयोग होतो. संशोधनानुसार, झिंकमुळे वीर्याची गुणवत्ता वाढून प्रजननक्षमतेतही वाढ होते.

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game kheltehо?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.– **डॉन प्याट**


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रिय:।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर-वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म-मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

### उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

### आडवे उत्तर

१.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमलकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

### उभे उत्तर

१.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस

# पायभूत सुविधा निर्मितीतून लातूर पोलीस दल आणखी सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार -पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

- लातूर सायबर पोलीस ठाण्याच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण
- नवनियुक्त ४६ पोलीस कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप
- क्यूआर कोड आधारित पेट्रोलिंग यंत्रणेचा शुभारंभ





**लातूर/प्रतिनिधी :** पारंपारिक गुन्हेगारी आणि सायबर गुन्हेगारीमध्ये मोठा फरक आहे. आताचा सायबर गुन्हेगार कुठेतरी दूरवर बसून सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करत आहे. अशा आव्हानात्मक काळात नागरिकांच्या सायबर सुरक्षिततेसाठी आणि सायबर गुन्ह्यांच्या उकलीसाठी लातूर सायबर पोलीस ठाण्याची नूतनीकृत अद्यायवत इमारत उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले. तसेच आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देवून पोलीस दलाला अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला लातूर पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात सायबर पोलीस ठाण्याच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते झाले. नव्याने पोलीस दलात भरती झालेल्या ४६ पोलीस कर्मचाऱ्यांना यावेळी नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली, तसेच जिल्हाभरात राबवण्यात येणाऱ्या 'क्यूआर कोड आधारित पेट्रोलिंग' यंत्रणेचाही शुभारंभ करण्यात आला. विधान परिषद आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संजय बनसोडे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस दलाला सुसज्ज घरे आणि आधुनिक सोयी-सुविधा देण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. लातूर जिल्ह्यातही पोलिसांना नवीन घरे, पोलीस अधीक्षक कार्यालयाला सुसज्ज इमारत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातूनही आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. लातूर जिल्हा पोलीस दलाने गेल्या वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पोलिसांनी ड्रग्ज रॅकेट आणि बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत अधिक सजग राहून गुन्हेगारांवर वचक निर्माण करावा, असे ते म्हणाले.

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण पाहता सायबर ठाण्यांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. लातूरमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शहरात अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना आमदार विक्रम काळे यांनी केली.

### लातूर पोलीस दलाच्या लोकशक्ती रिल्स स्पर्धेला सुरुवात

सायबर फसवणूक, व्यसनाधीनता आणि वाहतूक नियम यांबाबत जनजागृती करण्यासाठी लातूर पोलीस दलामार्फत लोकशक्ती रिल्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माहितीपत्रकाचे अनावरण पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. रिल्स हे समाज परिवर्तनाचे साधन बनावे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे, असे अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी या स्पर्धेविषयी माहिती देताना सांगितले.

लातूर शहरात क्युआर कोड आधारित पेट्रोलिंग यंत्रणा राबविण्यात येत आहे. आता हा उपक्रम जिल्ह्यातील २३ पोलीस ठाण्यांतर्गत राबविण्यात येणार असून यासाठी ९०७ ठिकाणी क्युआर कोड बसविण्यात आले आहेत. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी क्यूआर कोड स्कॅन करून या उपक्रमाचा शुभारंभ केला.

उपविभागीय अधिकारी समीरसिंह साळवे यांनी 'क्यूआर कोड पेट्रोलिंग'बद्दल माहिती दिली, तर सायबर पोलीस ठाण्याच्या निरीक्षक बबिता वाकडकर यांनी आजवर तक्रारदारांचे ७७ लाख रुपये परत मिळवून दिल्याबद्दल माहिती दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

जिल्ह्याच्या निर्मितीपासून लातूर पोलीस दल विविध क्षेत्रात अग्रेसर राहिले आहे. येथील लोकप्रतिनिधी सदैव पोलीस दलाच्या पाठीशी उभे राहतात, ही लातूरची राजकीय संस्कृती आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी लातूर पोलीस दलाने पुढाकार घ्यावा, असे आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले.

खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी लातूर जिल्हा पोलीस दल कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी करत असल्याचे सांगितले.

सायबर पोलीस ठाण्याच्या नूतनीकृत अद्ययावत इमारतीमुळे सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यास मदत होईल, असे आमदार संजय बनसोडे म्हणाले. तसेच लातूरचे पोलीस दल आव्हानात्मक परिस्थितीतही सामाजिक बांधिलकी जपत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी प्रास्ताविक केले. 'आपले लातूर सुरक्षित लातूर' उपक्रमांतर्गत लोकसहभागातून जिल्ह्यात ५१० सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. पोलीस केवळ गुन्हे उघड करत नाहीत, तर 'पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर' या उपक्रमातून शेतीचे वादही सोडवत आहेत, असे त्यांनी सांगितले. लातूर पोलीस लातूरकरांच्या सुरक्षेसाठी आणि सेवेसाठी सज्ज आणि सक्षम असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## सुवर्ण परिवारातर्फे मोफत व्रतबंध कार्यक्रम

**सोलापूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सुवर्ण परिवार हा सोनार समाजाचा एक राज्यव्यापी समूह असून वेळोवेळी सामाजिक बांधिलकी जपत विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत असतो. या समूहाचे प्रवर्तक , माजी कृषी अधिकारी व आयुर्वेदाभ्यासक श्री रत्नाकर वेदपाठक यांनी पांचाळ सोनार समाजातील मुलांसाठी याच सुवर्ण परिवार ग्रुप तर्फे विनाशुल्क, मोफत व्रतबंध सोहळा कार्यक्रम २०२६ आयोजित नियोजित केला असून सदर उपक्रमासाठी सर्व ग्रुप सदस्यांना ऐच्छिक यथाशक्तीनुसार अर्थसाह्याचे आवाहन केले आहे. या सुवर्णपरिवार ग्रुपने यापूर्वीही अशीच समाज उपयोगी उपक्रम म्हणजे अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत असो किंवा समाजातीलच गरजवंत सुशिक्षित बेरोजगार मुला-मुलींसाठी नोकरी उपक्रम ही राबवला होता. सुवर्ण परिवार तर्फे घेतला जाणारा हा बहुधा सोनार समाजाचा महाराष्ट्रातील पहिलाच भव्य एकमेव विनाशुल्क व्रतबंध कार्यक्रम आहे त्यामुळे अशा अभिनंदनिय उपक्रमाविषयी सर्वत्र कौतुक होत असून समाजातील इतरही तथाकथित सामाजिक संस्थांनीही अशाच पद्धतीचे अनुकरणीय समाज उपयोगी व गरजवंतांसाठी विनाशुल्क आवश्यक कार्यक्रम राबवले पाहिजेत अशी अपेक्षा जनमानसात व्यक्त होत आहे.

## NSUI चा उपक्रम : NEET पेपर निमित्ताने पालकांना बसण्याची व्यवस्था व पाणी वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी म्हणून ओळख असलेल्या लातूर शहरात येत्या ३ मे रोजी होणाऱ्या NEET परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विद्यार्थी काँग्रेस, लातूर तर्फे परीक्षा केंद्राबाहेर पालकांना बसण्याची व्यवस्था करण्यात येणार असून, उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सुमारे १० हजार पाण्याच्या बाटल्यांचेही वितरण केले जाणार आहे.

या उपक्रमाचा जास्तीत जास्त पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यार्थी काँग्रेस, लातूर चे जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार आणि जिल्हा-उपाध्यक्ष महेश सोळंके यांनी केले आहे. यावेळी उबेद शेख, श्रवण काकडे, अबूजर शेख, कमलेश वारद, प्रथमेश राठोड आणि चैतन्य रोडे हे उपस्थित होते.

## मुक्तांगणइंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूरमधील विशाल नगर परिसरातील मुक्तांगणइंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी राष्ट्रपितामहात्मा गांधी यांच्याप्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेच्या समन्वयिका माधुरीवाघमारे, प्रणिता सुरवसे, सुवर्णा माळवदकर, आशा यादव, निशिगंधा सोट, गीता उन्हाळे, अरुणा राठोड,मीरा इघारे यांची उपस्थिती होती.

यावेळी शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी सूत्रसंचलन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका वशिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणात मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी आयोजित समारंभात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर पोलीस दलातील वाचक प्रमोद मोहनराव बोंडले, सहायक पोलीस उपनिरीक्षक रजनीकांत प्रल्हाद भोसले, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रवीण जीवनराव मोटेगावकर, राजेश विठ्ठलराव कंचे यांना पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या जिल्हा युवा पुरस्काराचेही यावेळी वितरण करण्यात आले. सुलेमान अफसर शेख, सृष्टी सुधीर जगताप, उदगीर येथील कै. नामदेवराव सटवाजी गायकवाड बहुद्देशीय सेवाभागी संस्था यांना सन २०२४-२५ करिता जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच रामेश्वर धनराज चावरे, प्रणवी प्रधान ढवारे आणि एरंडी येथील स्वामी विवेकानंद सेवाभावी संस्था यांना सन २०२५-२६ करिता जिल्हा युवा पुरस्कार देण्यात आला.

कुमिदिनी भार्गव, अनघा अंधोरीकर, सुकेशनी बालाजी मुस्कावाड, आशा किशनराव पांचाळ यावेळी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते महिला व बालविकास विभागाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच शिक्षण विभागाच्या पुढारी टॅलेंट सर्च परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी अदिब रफिक सय्यद, पुनम प्रवीण कोडे, कार्तिकी रामराव जाधव यांनाही यावेळी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारा तेजस्वी दीप म्हणजे बाबासाहेब - राहुल केंद्रे



**अजगर मजकुरी/नळेगाव :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लोहारा गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे बोलत होते.

ते म्हणाले की, समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारा तेजस्वी दीप म्हणजे बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांनी दिलेल्या शिक्षण, स्वाभिमान आणि हक्कांच्या लढ्यामुळे समाजातील वंचित घटकांना नवे आयुष्य मिळाले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांचे विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे असून समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमास गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांनी बाबासाहेबांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प केला. यावेळी सरपंच महादेवी कांबळे व्यंकटराव पाटील विजयकुमार कांबळे दयानंद सोनटक्के प्रकाश हैबतपुर मोहन पाटील दयानंद सोनटक्के चंद्रकांत भारमोडे बबन धनबा उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिनानिमित्त अपर जिल्हाधिकारी श्रीमती सुचिता भिकाने यांच्या हस्ते महापारेषणमध्ये ध्वजवंदन




महापारेषणमध्ये ६७ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्यासमवेत महापारेषणचे अधिकारी.

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या हस्ते महापारेषणच्या वांद्रे येथील सांघिक कार्यालयाच्या प्रकाशगंगा इमारतीत राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी महापारेषणच्या वतीने राष्ट्रगान, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले व राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. अमित नाईक, अधीक्षक अभियंता श्री. सचिन खडगी, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नितीन कांबळे, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, कार्यकारी अभियंता श्री. तुषार वारूळे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. प्रवीण इंगळे, प्रणाली विश्लेषक श्री. अतुल वारजूरकर, व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर, उपव्यवस्थापक (मानव संसाधन) श्रीमती अश्विनी तेरकर, सहायक अभियंता (स्थापत्य) श्री. अनुराग रांगणकर यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ख्वाजा बंदा नवाज उर्स-ए-शरीफ २०२६ निमित्त हैदराबाद-कलबुर्गी दरम्यान ४ विशेष रेल्वे गाड्या

**सोलापूर/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेने Urs-E-Shareef २०२६ निमित्त Khwaja Banda Nawaz यांच्या उर्स उत्सवासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी हैदराबाद ते कलबुर्गी (सोलापूर विभाग) दरम्यान ४ विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

**हैदराबाद-कलबुर्गी उर्स विशेष (एकूण ४ फेऱ्या)**

गाडी क्रमांक ०७१७७ विशेष ही गाडी कूव्रशीरलरव येथून दि. ०२.०५.२०२६ व ०५.०५.२०२६ रोजी रात्री २३:५५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०७:०० वाजता घरश्ररलींीरसळ येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

गाडी क्रमांक ०७१७८ विशेष ही गाडी घरश्ररलींीरसळ येथून दि. ०३.०५.२०२६ व ०६.०५.२०२६ रोजी सकाळी ०७:४० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी १४:०० वाजता कूव्रशीरलरव येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

**थांबे**

बेगमपेट, सनतनगर, हाफीजपेट, लिंगमपल्ली, शंकरपल्ली, विकाराबाद, तांडूर, सेडम, मलकैद रोड, चित्तापूर आणि वाडी येथे या गाड्यांना थांबे दिले आहेत.

**डब्यांची रचना**

या विशेष गाड्यांमध्ये एकूण १६ डबे असतील. त्यामध्ये

२ स्लीपर क्लास

१४ सेकंड क्लास सिटिंग (यामध्ये २ लगेज कम गार्ड ब्रेक व्हॅन समाविष्ट)

आरक्षण व बुकिंग

या विशेष गाड्यांसाठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच खठउढउ संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

अनारक्षित डब्यांसाठी तिकीट स्टेशनवरील काउंटरवर तसेच RailOne App द्वारे घेता येईल.

प्रवाशांनी गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकीटासह प्रवास करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## विविध संस्था, संघटना पदाधिकारी नागरिकांच्या आ. अमित देशमुख यांनी घेतल्या भेटी





**लातूर/ प्रतिनिधी:** शुक्रवार दि. १ मे २०२६ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १ मे रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटना पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेत संवाद साधला तसेच त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन निवेदने,निमंत्रनाचा स्वीकार करीत संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,कल्याण पाटील,गोविंद देशमुख, डॉ. अभय कदम, पप्पू देशमुख, राजश्री देशमुख, सचिन मस्के, दादासाहेब करपे, माधव गंभीरे, नितीन जाधव, ड.राहुल पांडे, बालाजी पाराशर, अजय वागदरे, डॉ.माधव शिंदे, सहदेव मस्के, ईनायत सय्यद, बच्चेसाहेब देशमुख, प्रा. विकास कदम, आकाश सावंत, मधुकर सांडूर, सुभाष सांडूर आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# जिद्दीच्या वारशातून लातूर जिल्ह्याचा विकास साधूया-पालकमंत्री

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी लातूर येथे राष्ट्रध्वज वंदन समारंभ उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** भूकंपाच्या संकटाने हादरलेल्या लातूर जिल्ह्याने अत्यंत जिद्दीने स्वतःला पुन्हा उभे केले आणि आपली क्षमता सिद्ध केली. तोच जिद्दीचा वारसा पुढे नेत, आपण राज्याच्या विकास प्रक्रियेत लातूरचे नाव अग्रभागी नेऊया आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधूया, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणात मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन समारंभात पालकमंत्री श्री. भोसले बोलत होते. या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्र्यांनी यावेळी सर्व जिल्हावासीयांना महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करून आणि महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले, महाराष्ट्राने गेल्या ६६ वर्षांत तंत्रज्ञान, उद्योग आणि शेती क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नात महाराष्ट्र आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्याचा विकास वेगाने होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेती विकास आणि जलसंधारणासाठी जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियान राबविले जात आहे. मनरेगा आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून गतवर्षी ७३० हेक्टरवर फळबाग लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात मागील वर्षी पूर, अतिवृष्टीने शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ९२८ कोटी २८ लाख रुपयांची मदत वितरीत करण्यात आली आहे, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले.

प्रलंबित जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लागला असून या रुग्णालयाचे नुकतेच





भूमिपूजन झाले आहे. लवकरच याठिकाणी ५०० खाटांचे सुसज्ज जिल्हा रुग्णालय उभे राहील. त्यामुळे आरोग्य सेवा अधिक बळकट होणार आहे. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी आणि आयुष्मान भारत-महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतून गरजू रुग्णांवर कोट्यवधी रुपयांचे मोफत उपचार करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळविण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाईन व अधिक गतिमान झाल्याने रुग्णांना मदत होणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्ह्यात आतापर्यंत ७ हजार किलोमीटर रस्त्यांची कामे झाली आहेत. लातूर शहरासाठी ६० किलोमीटरचा रिंग रोड मंजूर असून, त्यासाठी ४८ किलोमीटर भूसंपादन पूर्ण झाले आहे. या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळावा, यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. आशियाई विकास बँकेच्या मदतीने जिल्ह्यात ८६ किलोमीटर रस्त्यांची कामे सुरू आहेत. अर्थसंकल्पात १४७ कोटी रुपयांची नवीन कामे मंजूर झाली आहेत, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले.

येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. भूकंपानंतर लातूरला पुन्हा उभे करणाऱ्या या मातीतील मुलांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. लातूरचा विद्यार्थी नोकरी मागणारा नव्हे, तर नोकरी देणारा बनला पाहिजे, हेच आपले स्वप्न असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

सध्या उन्हाळा अधिक तीव्र आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार बांधवांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. जिल्ह्यातील पाणी टंचाईसाठी २० कोटी ९६ लाख रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. सध्या २ टँकर सुरु असून २५ विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यंदा एल- निनोमुळे कमी पाऊस अपेक्षित आहे, त्यामुळे खरीप हंगामासाठी विशेष तयारी केली जात आहे. पाणी टंचाईचे संभाव्य संकट लक्षात घेवून नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

पालकमंत्री श्री. भोसले यांनी यावेळी पोलीस परेडचे निरीक्षण केले. उपविभागीय अधिकारी अरविंद रायबोले यांनी पोलीस परेडचे नेतृत्व केले. पोलीस पथकांसह गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्र सेना, पोलीस बॅण्ड पथक, श्वान पथक, वज्र वाहन, बॉम्ब शोधक पथक, जलद प्रतिसाद पथक, रुग्णवाहिका यांच्यासह विविध शासकीय विभागांचे चित्ररथ या पथसंचलनात सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता आणि वीरपिता यांची पालकमंत्री श्री. भोसले यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार केला आणि महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच जिल्हा युवा पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, टॅलेंट सर्च परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महापारेषणच्या प्रकल्पांना गती



**नाशिक/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी नाशिक येथे कुंभमेळा-२०२७ च्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विविध वीज पारेषण प्रकल्पांची पाहणी करून कामांना गती देण्याचे निर्देश दिले.

महापारेषणच्या नाशिक परिमंडळ कार्यालयात आयोजित बैठकीनंतर डॉ. संजीव कुमार यांनी २२० के. व्ही विल्होळी उपकेंद्र (राजूरबहुला), ४०० के. व्ही. पिंपळगाव (सारोळे), २२० के. व्ही. म्हसरूळ आणि १३२ के. व्ही. पंचवटी (म्हेरी) येथील उपकेंद्र प्रकल्पांना भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. या प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर आहे.

सुमारे ६४३ कोटींच्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पांना वेळेत पूर्ण करण्यासाठी डॉ. संजीव कुमार यांनी विशेष भर दिला. पावसाळ्यापूर्वी सर्व स्थापत्य कामे पूर्ण करावीत तसेच डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व प्रकल्प पूर्णत्वास न्यावेत, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले. यानंतर झालेल्या आढावा बैठकीत कंत्राटदारांना आवश्यक प्रशासकीय मदत देण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच प्रत्येक १५ दिवसांनी प्रगतीचा आढावा घेण्यात येणार असल्याचेही डॉ. संजीव कुमार यांनी सांगितले.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील वीजपुरवठा अधिक सक्षम व विश्वासार्ह करण्यासाठी हे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

यावेळी संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. डी. व्ही. पडळकर, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, श्री. किशोर गरूड, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता श्री. श्रीकृष्ण नवलाखे, श्री. सागर जारे उपस्थित होते.

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी श्याम सुरेश पवार कुटुंबियांचे केले सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेचे माजी महापौर सुरेश पवार यांचे नुकतेच निधन झाले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. ३० एप्रिल रोजी सायंकाळी लातूर शहरातील कोरे गार्डन परिसरातील श्याम सुरेश पवार यांच्या निवासस्थानी जाऊन लातूर शहर महानगरपालिकेचे माजी महापौर सुरेश पवार यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांचे सुपुत्र श्याम सुरेश पवार व पवार कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यांना धीर दिला. यावेळी विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, सुखदेव पवार, जगन्नाथ पवार, अनिकेत पवार, राहुल पाटील, गिरीश ब्याळे, मंजुषा अग्रवाल, लक्ष्मीकांत मंठाळे, चंद्रकांत पाटील, जयप्रकाश अग्रवाल, गौस गोलंदाज, शफी टाके, सिकंदर पटेल, श्रीधर शिंदे, अवि हुरदळे, आबेद गोलंदाज, माधव घोडके आदिसह पवार कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.







## कामगार दिनानिमित्त महावितरणच्या ४८ गुणवंत कामगारांचा गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त महावितरणच्या परिमंडल कार्यालयात राष्ट्रध्वज वंदनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी कामगार दिनानिमित्त आयोजीत गुणवंत कामगार गौरव समारंभात ७ यंत्रचालक व ४१ तंत्रज्ञ कामगारांचा मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्राचे वितरण करून गौरव करण्यात आला.

उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, सहाय्यक विधी अधिकारी श्रीकांत चेडे, उपव्यवस्थापक मासं प्रिया शितोळे, सहाय्यक अभियंता सुदर्शन बोळेगावे, निम्नस्तर लिपिक अमीत नाचणे तसेच स्वाभिमानी संघटनेचे प्रशांत खंडागळे यांच्या उपस्थितीत परिमंडल कार्यालयात पार पडलेल्या गौरव सोहळयात उल्लेखनीय वीजसेवा देत वीजग्राहकांच्या मनामध्ये महावितरणबाबत सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यात योगदान देणाऱ्या ४८ तांत्रिक कामगारांचा सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देवून गुणवंत कामगार म्हणून गौरव करण्यात आला. याप्रसंगी वीजसेवा क्षेत्रात होत जाणारे बदल लक्षात घेवून उत्कृष्ट ग्राहकाभिमुख सेवा कशी देता येईल याकडे गांभिर्यपूर्वक लक्ष द्यावे. सोबतच अपघात विरहीत व सुरक्षीत सेवा देण्यासाठी आपण फाजील आत्मविश्वास न बाळगता सतर्क राहूण काम करावे असे विचार मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले. लातूर जिल्हयातील २० कामगारांचा, बीड जिल्हयातील १५ कामगारांचा तर धाराशीव जिल्हयातील १३ कामगारांचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला. गौरव सोहळया प्रसंगी मुख्य अभियंता अरविंद बुलबुले पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत म्हणाले की, अपघात विरहीत सेवा देत वीजबील वसूलीद्वारे महसूल वाढीचे कामही तांत्रिक कामगारांकडून होत आहे. महावितरण प्रशासनाने नव्याने केलेले बदल व अत्याधूनिक सेवा आत्मसात करत कंपनीचा हिताच्या दृष्टिनेच कार्यरत राहण्याचे कार्य सर्व कामगारांनी यापुढेही सातत्याने सुरूच ठेवले पाहिजे. सोबतच वीजयंत्रणेची देखभाल दुरूस्ती करत असताना उपकेंद्रातील आर्थिंग वारंवार तपासणे, डिस्चार्ज रॉड वापरणे तसेच रीतसर परमीट घेवूनच काम करणे याबाबीकडे गांभिर्याने लक्ष द्यावे असे विचारही श्री. बुलबुले यांनी व्यक्त केले. या गौरव सोहळयाचे प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर यांनी केले. तर सुत्रसंचालन सिध्दार्थ कुसभागे यांनी केले. श्रीमती यशोदा पालकर यांनी आभार व्यक्त केले.


टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-

मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी

संपर्क

8600025070

9028376965

प्रिंटर्स पॅराडाईस

प्रिंटर रिपेअरिंग

कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस

टोनर रिफिलिंग


### समस्या जटील होई

लव्ह जिहाद प्रकार
दावी कु वृत्ती विद्रुप
समस्या जटिल होई
गुन्हे प्रकाशांत तद्रुप

भुमिकाबदलत जाई
स्टँडघेई प्रसंगानुरूप
डागाळला संशयग्रस्त
छानसमाज सुस्वरुप

कोण घाले खतपाणी
बदलू टाकत रंग रूप
राजकारणाला कुरण
नव्यांनी स्फुरण हुरुप

उघडीस येवू लागलेत
नवनवीन फंडे रे खूप
विदारक बनवा चित्रा
कुणी चोपडे तेल तूप

कसली भिती ग्रासली
का पीडित बसले चूप
एखादी धारिष्ट दाखवे
तोडी जखडले कुलूप

एफआयआर अस्वस्थ
नोंदी करता चिडीचूप
खोलवर रुजलेलीमुळे
भ्रम संभ्रमात अंधकूप

सत्य असत्य गोंधळात
अंतरात अंधार घडघूप
गुन्हेगार पकडण्यासाठी
उशीरा चालते धावधूप

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

### श्री केशवराज मा. वि. सेवक राजकुमार बेलुरे व विजय कुलकर्णी यांचा सेवागौरव सोहळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील नाईक राजकुमार बेलुरे (४० वर्षे सेवा )व सेवक विजय कुलकर्णी (३५ वर्षे सेवा ) हे आपल्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ सेवेचा गौरव करण्यासाठी विद्यालयाच्या वतीने दि. ३० एप्रिल २०२६ गुरुवार रोजी सेवागौरव सोहळा संपन्न करण्यात आला. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, सत्कारमूर्ती राजकुमार बेलुरे व सुरेखा बेलुरे तसेच विजय कुलकर्णी व अनुराधा कुलकर्णी, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी सत्कारमूर्तींनी केलेल्या कार्याविषयी माहिती सांगून, त्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शाळा सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत कार्य करणारे असे आजचे सत्कारमूर्ती आहेत. त्यांचे श्रम हे अमूल्य आहेत. त्यांचा असलेला जनसंपर्क, शाळेसाठी दिलेले योगदान, सर्व कामातील पारंगतता याबद्दल माहिती सांगितली.

यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी अध्यक्षीय समारोपात सत्कारमूर्तींचे गुणवैशिष्ट्ये सांगताना असे सांगितले की, गृहसंपर्क असणारे, कर्तव्यनिष्ठ , प्रामाणिक व विद्यार्थीप्रिय व शिक्षकप्रिय असे सेवक आहेत त्यांनी संस्थेच्या उभारणीमध्ये रात्रंदिवस काम केले. सेवानिवृत्तीनंतरच्या काळात भारत भ्रमण करावे, चारधाम यात्रा करावी तसेच कुटुंबाला जास्तीत जास्त वेळ द्यावा अशी इच्छा व्यक्त करून त्यांना सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यालयाच्या वतीने सत्कारमूर्ती राजकुमार बेलुरे व विजय कुलकर्णी यांचा यथोचित सपत्नीक सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ,सन्मानपत्र असा यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी सत्कारमूर्ती राजकुमार बेलुरे यांनी आपल्या सेवेतील विविध आठवणी व भावना व्यक्त केल्या.


लातूर समाचार
रोज वाचा ऑनलाईन
www.latur samachar.com
वेबसाईट वर..



मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
डिजिटल फलकाची तरतूद

**कोटेशन सूचना क्र.:** SUR/C/Quotation/ Digital Access/Board/2026. DRM(C) विभागीय रेल्वे व्यवस्थापक मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामासाठी प्रतिष्ठित संस्था/ कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील वाडी, शहाबाद, गंगापूर रोड, दुधनी, धाराशिव, पंढरपूर आणि लातूर या स्थानकांवर डिजिटल क्सेस मॅप बोर्ड बसवण्याची तरतूद करणे. **कामाचा अंदाजित खर्च:** ४,६२,०००/-. **अनामत रक्कम:** ९,३००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २ महिने. **देखभालीचा कालावधी:** २४ महिने. **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. **कोटेशन सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** ०८.०५.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **कोटेशन उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०८.०५.२०२६ रोजी १५.३० वाजल्यानंतर. पुढील सहाय्यासाठी आणि आवश्यक मार्गदर्शनासाठी, कृपया सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) कार्यालयात स्थित असलेल्या वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक (Sr. DCM) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. EXP-23

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६